CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com

lakshamaha.dhule@gmail.com

lakshamaha.nsk@gmail.com




▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३२६ वा ▶ गुरुवार दि. २१ सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**धुळे ।** भरधाव टँकरने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार ठार झाला. रमेश लोटन भदाणे असे त्याचे नाव आहे. रमेश भदाणे दुचाकी (एमएच ४८, बीके ३१४२) सह मुंबई-आग्रा महामार्गावरील अवधान फाट्यावर उभे होते. यादरम्यान त्यांना मालेगावकडून धुळ्याकडे भरधाव टँकर (जीजे १२, बीएक्स ८७४१) ने पुढील वाहनास ओव्हरटेक करताना जोरदार धडक दिली. त्यात गंभीर जखमी होऊन भदाणे यांचा मृत्यू झाला. पोलिस ठाण्यात टँकरचालक मोनुकुमार अंबालाल मिणा याच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला.

### पोलिस लाइनमधून रोहित्र लांबविले

**धुळे ।** चोरट्यांनी शहरातील पोलिस लाइनमधून शंभर केव्ही क्षमतेचे ७० हजारांचे रोहित्र व त्याचे साहित्य लंपास केले. वायरमन एस. एल. मरसाळे यांना पाहणीदरम्यान पोलिस लाइनमधील ब्लॉक क्रमांक ३२ व १७ मध्ये दोन खांबांवरील लोखंडी चायनल तसेच पोलिस मुख्यालय परिसरात रोहित्र आढळले नाही. त्यामुळे डीपीसह लोखंडी चायनल चोरट्यांनी लंपास केल्याचे वायरमन मरसाळे यांनी कळविले.

# लोकसभेत महिला आरक्षण विधेयक बहुमताने मंजूर समर्थनार्थ ४५४, तर विरोधात केवळ २ मते पडली

### आज राज्यसभेत होणार सादर

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

संसदेच्या विशेष अधिवेशनात लोकसभेत महिला आरक्षण विधेयक (नारी शक्ती वंदन विधेयक) बहुमताने मंजूर झाले आहे. विधेयकाच्या समर्थनार्थ ४५४ जणांनी चिठ्ठीद्वारे मतदान केले. तर, विधेयकाविरोधात केवळ दोन मते पडली. आता आज हे विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेत सादर केले जाईल.

लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर (नारी शक्ती वंदन विधेयक) चर्चेला उत्तर देण्यासाठी अमित शाह आले. ते म्हणाले-मी येथे १२८ व्या घटनादुरुस्तीबाबत बोलण्यासाठी उभा आहे. ते बोलू लागताच विरोधकांनी गदारोळ सुरू केला. यावर शाह हसले आणि राहुल गांधींची नक्कल करत.. डरो मत.. डरो मत.. असे म्हणू लागले. शाह म्हणाले- महिला आरक्षण विधेयक हे युग बदलणारे विधेयक आहे. भारतीय संसदेच्या इतिहासात दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर नवीन सभागृहात प्रथमच उदघाटन करण्यात आले. पहिल्यांदाच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले विधेयकही मंजूर करण्यात आले.

काही लोकांसाठी महिला सक्षमीकरण हा निवडणूक जिंकण्याचा मुद्दा असू शकतो, पण माझ्या पक्षासाठी आणि माझे नेते मोदी यांच्यासाठी हा मुद्दा राजकारणाचा नसून मान्यतेचा मुद्दा आहे. मोदींनीच भाजपमध्ये पक्षीय पदांवर महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले. देशातील जनतेने सीएमनंतर पीएम मोदींना पंतप्रधान केले. ३० वर्षांनंतर त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे पूर्ण बहुमत असलेले सरकार स्थापन झाले. त्यावेळी पीएम मोदींनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्याचे स्पष्ट झाले होते. त्यावेळी मोदींच्या खात्यात जे काही पैसे होते, ते त्यांनी वर्ग ३ कर्मचारी आणि मुलींच्या खात्यात पाठवले होते. जगभरात विमाने उडवणाऱ्या महिलांची संख्या ५% आहे. भारतात या महिलांची संख्या १५% आहे. हे महिला सक्षमीकरण आहे. शाह म्हणाले-ही घटनादुरुस्ती पहिल्यांदाच झालेली नाही. देवेगौडा ते मनमोहन जी यांच्यापर्यंत चार प्रयत्न झाले. सर्वप्रथम, १२ सप्टेंबर १९९६ रोजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांच्या काळात याबाबत घटनादुरुस्ती करण्यात आली. यावेळी काँग्रेस विरोधी पक्षात होती. हे विधेयक सभागृहात ठेवल्यानंतर ते गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला देण्यात आले, मात्र विधेयक सभागृहात पोहोचू शकले नाही. ११वी लोकसभा आली तेव्हा विधेयक रद्द झाले. यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात १२ व्या लोकसभेत हे विधेयक आले, पण ते हटवण्यात आले. अटलजींच्या काळात १३व्या लोकसभेत हे विधेयक पुन्हा आले, पण कलम १०७ अंतर्गत हे विधेयक हटवण्यात आले. यानंतर मनमोहन सिंग यांनी विधेयक आणले, मात्र ते विधेयक हटवण्यात आले. शहा म्हणाले की, कोणतेही जुने विधेयक जीवंत नाही. लोकसभा विसर्जित झाल्यावर प्रलंबित विधेयके रद्द होतात, असे त्यांनी सांगितले.



### विधेयकात ओबीसी महिलांनाही आरक्षण हवे : राहुल गांधी

**शाह यांच्याआधी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, मी महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थनात आहे. पण ते अपूर्ण आहे. जुन्या संसदेतून नव्या संसदेत येत असताना या प्रक्रियेत राष्ट्रपतींनी असायला हवे होते. आपल्या संस्थांमध्ये ओबीसींचा सहभाग काय आहे यावर मी संशोधन केले. सरकार चालवणाऱ्या ९९ सचिवांपैकी फक्त तीन ओबीसी आहेत. ते शक्य तितक्या लवकर बदला. हा ओबीसी समाजाचा अपमान आहे, असेही राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी बोलत असताना खासदारांनी गोंधळ घातला तेव्हा ते, डरो मत.. डरो मत.. म्हणाले. महिलांनीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला. महिला आरक्षण विधेयकावर अजिबात दिरंगाई होता कामा नये आणि आजपासूनच त्याची अंमलबजावणी व्हायला हवी, असेही ते म्हणाले.**

### तत्काळ अंमलबजावणी करा : सोनिया गांधी

**सोनिया गांधी म्हणाल्या, 'काँग्रेसची मागणी आहे की हे विधेयक तातडीने लागू करावे. सरकारने परिसीमन होईपर्यंत थांबवू नये. याआधी जात जनगणना करून या विधेयकात एससी-एसटी आणि ओबीसी महिलांना आरक्षण द्यावे. 'माझे पती राजीव गांधी यांनीच पहिल्यांदा महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देणारा कायदा आणला होता. त्यांचा राज्यसभेत ७ मतांनी पराभव झाला होता. नंतर पीव्ही नरसिंह राव यांच्या सरकारने ते मंजूर केले. याचाच परिणाम म्हणजे देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या १५ लाख महिला नेत्या आहेत. राजीव यांचे स्वप्न अर्धेच पूर्ण झाले आहे, हे विधेयक मंजूर झाल्याने स्वप्न पूर्ण होणार आहे.**

### विधेयक मंजूर झाल्यास लोकसभेत १८१ महिला खासदार असतील

**कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल म्हणाले की, सध्या लोकसभेत ८२ महिला खासदार आहेत, हे विधेयक मंजूर झाल्यानंतर १८१ महिला खासदार असतील. हे आरक्षण थेट निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना लागू असेल. म्हणजेच ते राज्यसभा आणि राज्यांच्या विधानपरिषदांना लागू होणार नाही.**

# नाशिक जिल्ह्यात कांदा लिलाव बंद सर्व १७ बाजार समित्यांना टाळे



### शेतकऱ्यांसमोर विक्रिची चिंता

**नाशिक । प्रतिनिधी**

कांदा व्यापाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी लासलगावसह नाशिक जिल्ह्यातील १७ बाजार समित्यांमधील लिलावात आजपासून सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. लिलाव बंदमुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली असून अंदाजे ३० ते ४० कोटींची उलाढाल थंडावली आहे. या बंदवर तोडगा काढण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून जिल्हाधिकारी जलज शर्मा व्यापाऱ्यांसोबत बैठक घेऊन प्रयत्न करत होते. परंतु, दोनदा बैठका होऊनही व्यापारी आपल्या भूमिकेवर ठाम असल्याने जिल्हाधिकाऱ्यांना देखील हा बंद मागे घेण्याबाबत यश आले नाही. त्यामुळे आज सकाळपासूनच नाशिकमधील सर्व बाजार समित्या बंद आहेत.

कांदा व्यापाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी लासलगावसह जिल्ह्यातील १७ बाजार समितीमध्ये लिलावात आजपासून सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. लिलाव बंदमुळे शेतकऱ्यांची चांगलीच कोंडी होणार असून कोट्यवधींची उलाढाल ठप्प होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वीच कांदा व्यापाऱ्यांच्या मागण्यांवर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. परंतु बैठक होऊनही तोडगा न निघाल्याने व्यापाऱ्यांनी बंदची हाक दिली आहे. 'जोपर्यंत सरकार निर्यात शुल्क आणि आमच्या मागण्यांवर चर्चा करत नाही, तोपर्यंत बाजार समित्या बंदच राहतील, लिलाव प्रक्रियेत व्यापारी सहभागी होणार नाही, असा इशारा कांदा व्यापाऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, मागील आंदोलनावेळी सरकारने दिलेलं आश्वासन अद्यापही पाळलेलं नाही. या पार्श्वभूमीवर तीन दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत तोडगा निघाला नाही. त्यामुळे येत्या काळात सरकारसोबत बैठकीचे आश्वासन दिले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून व्यापारी वर्ग दयनीय अवस्थेत असून मुख्यमंत्री आणि पणन मंत्री यांना पत्रव्यवहार केला असून त्यांनी चर्चा करावी, अन्यथा आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम असल्याचा आक्रमक इशारा व्यापारी वर्गाकडून देण्यात आला आहे.





### गणेश मंदिरात सामूहिक अथर्वशीर्ष पठण

**धुळे । ॐ नमस्ते गणपतये... त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि.. त्वमेव केवलं कर्तासि... असे अथर्वशीर्ष पठणाचे सामूहिक स्वर, महिलांनी केलेला शंखनाद आणि मोरया मोरया च्या जयघोषाने मंत्रमुग्ध झालेल्या वातावरणात महिलांनी सामुदायिकरित्या अथर्वशीर्षाचे पठण केले. ऋषिपंचमीच्या दिवशी गणपतीसमोर झालेल्या मंत्रोच्चाराने वातावरण मंगलमय आले होते. शहरातील शिवाजी रोडवरील सिद्धेवर गणपती मंदिर व योगवर्धिनी संस्थेतर्फे ऋषीपंचमीनिमित्त बुधवारी नदीकाठावरील सिद्धेश्वर गणपती मंदिरात सामूहिक अथर्वशीर्षाचे पठण, वाचन करण्यात आले.**

# नंदुरबारात वृद्धेला चाकू, बंदुकीचा धाक दाखवून २३ तोळे सोने लंपास

**नंदुरबार । प्रतिनिधी**

शहरातील जुनी सिंधी कॉलनीतील झुलेलाल मंदिराजवळ काल मध्यरात्री दरोडेखोरांनी वृद्ध दाम्पत्याला मारहाण करत चाकूचा व बंदुकीचा धाक दाखवून महिलेच्या अंगावरील तसेच कपाटातील ६ लाख ७९ हजार ८०० रुपये किमतीचे २३.५ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. वृद्ध दांपत्याने तीन दरोडेखोर असल्याची माहिती पोलिसांना दिली आहे. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उप अधीक्षक संजय महाजन, एलसीबी चे किरण खेडकर, उपनगरचे अजय वसावे, माजी आमदार शिरीष चौधरी आदींनी भेट दिली.



याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील नेहरु पुतळ्याजवळ जयहिंद ईलेक्ट्रॉनिक्सचे मालक नरेशकुमार लेखराज नानकाणी यांचे जुनी सिंधी कॉलनीत झुलेलाल नगरात राहतात. त्यांच्या घरात वडील लेखराज खिलुमल नानकाणी, आई मिरादेवी, पत्नी पिंकी, मुले गुंजन व कार्तीक सोबत राहतात. आज दि.२० सप्टेंबर रोजी मध्यरात्री २ ते ३ वाजेदरम्यान घरात सर्व जण झोपलेले असतांना त्यांच्या घरातील स्वयंपाक घरातील खिडकीची जाळी तोडून दरोडेखोरांनी घरात प्रवेश केला. त्यांनी मिरादेवी यांच्या गळ्यावर चाकु ठेऊन धाक दाखवुन अंगावरील सोन्याचे दागीने जबरीने काढले. त्यावेळी आरडाओरड केली तर जीवे मारण्याची धमकी दिली. घरातील गोदरेज कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने जबरीने काढत असतांना कपाट उघडण्याचा आवाज आल्याने लेखराज नानकानी यांना जाग आली. त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता त्यांना कशाने तरी डोक्यावर मारुन दुखापती केले. ओरडले तर गोळी मारण्याची धमकी दिली. सोन्याचे दागीने जबरीने घेऊन पळुन गेले.लेखराज नानकानी यांच्या सांगण्याप्रमाणे तिघा अनोळखी चोरांपैकी एकाने त्याचे तोंड काळ्या रंगाच्या कपड्याने बाधलेले व गडद मरुम रंगाचा हाफ बाहीचा शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातलेली तसेच ईतर दोघांनी काळ्या रंगाचे हाफ बाहीचे शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातलेली होती. तिघे अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयोगटाचे तसेच मध्यम सडपातळ शरिरियष्टीचे होते. याबाबत नरेशकुमार नानकानी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तिघांविरुध्द उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शासकीय-निमशासकीय कर्मचारी भरतीचे कंत्राटी धोरण रद्द करुन जुनी पेन्शन योजना लागू करा

**धुळे । प्रतिनिधी**

राज्य शासनाने बाहय यंत्रणकडून कामे करुन घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेचे / एजन्सीचे पॅनल नियुक्ती करण्यासाठी शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र. ९३/कामगार-८/ दिनांक ६/९/२०२३ निर्गमीत केलेला आहे. यापुर्वीच्या काळात वाहन चालक आणि परिचर या दोन संवर्गाची सरळसेवा भरती बंद करुन सदरची पदे ही कंत्राटी तत्वावर भरती करण्याचा निर्णय घेतला होता. आणि आता तब्बल १३८ संवर्गाची भरती ही खाजगी एजन्सीज् मार्फत कंत्राटी पध्दतीने करण्याचा शासन निर्णय निर्गमीत झाला ही बाब योग्य नसून संविधान विरोधी आहे. शासकीय कामकाज हे जबाबदार अधिकारी / कर्मचाऱ्यांमार्फतच होणे क्रमप्राप्त असतांना राज्य सरकार हे वारंवार अधिकारी/ कर्मचारी विरोधी धोरण पुकारत असल्यामुळे जनमानसात सरकार विरोधी तीव्रस्वरुपाच्या भावना निर्माण झाल्या असून कर्मचारी, बेरोजगारांमध्ये संतापाची लाट निर्माण झालेली आहे. म्हणून राज्य सरकारने दि ०६/०९/२०२३ चा निर्गमीत केलेला शासन निर्णय त्वरीत रद्द करुन शासकीय कामकाजाचे कंत्राटीकरण थांबवून सदर पदांची भरती प्रक्रीया ही नियमितपणे सरळसेवेने करण्यात यावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे करण्यात आली आहे.



यावेळी सदर शासन निर्णयाची होळी करुन निषेध करण्यात आला. त्याचप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू व्हावी यासाठी शासनाने एक महिन्याचे आश्वासन दिले होते. आश्वासन देऊन आता तब्बल सहा महिने झाले. तरी देखील अद्यापपर्यंत त्यावर निर्णय झालेला नाही. तरी जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात दिलेल्या आश्वासनाची देखील पुर्तता तात्काळ करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी जि.प.सर्व संवर्गीय कर्मचारी संघटनांचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र नांद्रे, दिनेश महाले, वनराज पाटील, किशोर पगारे, डी.एम.पाटील, शशांक रंधे, डी.ए.पाटील, जयदिप पाटील, राहुल पवार, नरहर पाटील, सचिन गुंडलेकर, ज्ञानेश्वर बावीस्कर, अनिलकुमार सोनवणे, दिपक महाले, वैशाली निकम, रंजना साळुंके, शोभा वेताळे आदी जि.प.कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने नंदाभवानी मंदिर कामाची स्थगिती उठली

### कापडणे जोगाई माता मंदिर कामाचाही समावेश

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने मंजुर झालेल्या नंदाभवानी मंदिर परिसर रावेर ता.धुळेच्या पर्यटन व तिर्थस्थळ विकासाच्या कामाला मिळालेली स्थगिती उठविण्यात आली आहे. सदर कामावरील स्थगिती उठविण्यात यावी म्हणून आ.पाटील यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. नंदाभवानी मंदिर परिसर विकास कामासाठी एकूण ४ कोटी ९० लक्ष रुपयाच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.दरम्यान कापडणे ता.धुळे येथील जोगाई माता मंदिर परिसर विकास कामावरीलही स्थगिती आ.पाटील यांच्या प्रयत्नाने उठविण्यात आली आहे. या कामासाठी एकूण २७ लक्ष ५३ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

यावाबत सविस्तर वृत्त असे कि, धुळे तालुक्यातील नंदाभवानी हे जागृत देवस्थान असून धुळे जिल्हयासह खान्देशातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. वनक्षेत्रात असल्यामुळे तिर्थक्षेत्राबरोबर पर्यटनस्थळ म्हणून नंदाभवानी देवस्थान परिसराचा विकास व्हावा म्हणून आ.कुणाल पाटील यांनी राज्याच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित करुन वेळोवेळी आवाज उठविला होता. तसेच राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२१ ला याबाबतचा प्रश्न मांडला होता. दरम्यान आ.कुणाल पाटील यांनी तत्कालीन पर्यटन मंत्री ना.आदित्य ठाकरे यांची नंदाभवानीच्या देवस्थान परिसराचा विकासासाठी निधी मिळावा म्हणून भेट घेतली होती. यावेळी तत्कालीन पर्यटन मंत्री ना.ठाकरे यांनी जिल्हाधिकारी धुळे यांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केल्या होत्या. आ.कुणाल पाटील यांनी पाठपुरावा केल्यानंतर सन २०२१मध्ये या कामास मंजुरी मिळाली होती. यासाठी एकूण ४ कोटी ९० लक्ष रुपये मंजुर करण्यात आले होते. दरम्यान भाजपा-शिंदे सरकार आल्यानंतर सदर कामांना स्थगिती देण्यात आली होती. या कामांची स्थगिती उठविण्यात यावी म्हणून आ.कुणाल पाटील यांनी विद्यमान सरकारकडे पाठपुरावा करुन स्थगिती उठविली आहे. त्यामुळे नंदाभवानी मंदिर परिसर विकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

### या कामांचा समावेश

**नंदाभावनी परिसर विकासासाठी मंजुर करण्यात आलेल्या ४ कोटी ९० रु. निधीतून मुख्य प्रवेशव्दार, भक्तनिवास, प्रसादालय, सभामंडप,बगीचा व परिसर सुशोभिकरण, लहान मुलांसाठी खेळण्याची साधने,विद्युतीकरण, पाणी पुरवठ्याची सोय, वाहनतळ,शौच्छालय आदी कामे करुन भाविकांची सोयी सुविधा व विकास केला जाणार असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.**



### जोगाई माता मंदिर कापडणे

**धुळे तालुक्यातील कापडणे येथील जागाई माता मंदिर परिसर विकास कामासाठीही आ.कुणाल पाटील यांनी एकूण २७ लक्ष ५३ हजार रुपयांचा निधी मंजुर केला होता. कापडणे ग्रामस्थ व परिसरातील नागरीकांचे श्रध्दास्थान असलेले जोगाई माता मंदिर परिसर विकास कामाचीही स्थगिती आ.पाटील यांच्या प्रयत्नाने उठविण्यात आली आहे. त्यामुळे आता या कामालाही गती मिळणार आहे.**

# कावनई येथील कपिलधारा तीर्थावर महिला भाविकांची स्नानासाठी अलोट गर्दी

**नाशिक । प्रतिनिधी**

इगतपूरी तालूक्यातील कावनई येथील कपिलधारा येथील प्रसिध्द तीर्थक्षेत्री शिवमंदिर व राममंदिरात ऋषी पंचमी निमित्त स्नानासोबत शिव पुजनासाठी भाविकांची अलोट गर्दी पहावयास मिळत आहे. अधिक मास नंतर आता ऋषी पंचमी निमित्त हजारो भक्त महिला भाविकांनी स्नानाचा व शिव दर्शनाचा लाभ घेतल्याची माहिती विश्वस्त कुलदीप चौधरी यांनी दिली.

यावेळी मंदिराचे महंत रामनारायण दास फलहारी महाराज व पुरणचंद्र दास उडिया महाराज उपस्थित होते. कपिलधारा तीर्थक्षेत्र या ठिकाणी फार प्राचीन काळापासून कुंभमेळ्याची सुरूवात होत असल्याने हे शिवतीर्थ व राम मंदिर प्रसिध्द आहे. या मंदिरात दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी फार मोठी यात्रा भरते. भाद्रपद महिन्यातील तृतीया अर्थात हरितालिका पूजनानंतर चतुर्थीला पार्थिव गणेश पूजन केले जाते. आणि भाद्रपद पंचमी ही ऋषी पंचमी म्हणून ओळखली जाते. श्रावणातील व्रत-वैकल्यांप्रमाणे ऋषिपंचमीचे व्रतही महिला करतात. या व्रताअंतर्गत दरवर्षी महिला पुजा व स्नानासाठी या तीर्थावर येतात. ऋषींबद्दल आदरभाव व्यक्त करण्यासाठी ऋषी पंचमी सण साजरा केला जातो.

## नारीची राजकीय शक्ती

संसदेत आणि राज्यांमधील विधिमंडळात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी मोदी सरकारने सादर केलेले विधेयक मंजूर झाल्यास ते नि:संशयपणे ऐतिहासिक ठरेल. महिलांना अशा प्रकारचे आरक्षण मिळावे यासाठी गेल्या २७ वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत आणि यापूर्वी सहा-सात वेळा हे विधेयक मांडले गेले आहे; २०१०मध्ये तर ते राज्यसभेत मंजूरही झाले होते; परंतु या आरक्षणांतर्गत विविध जातसमूहांतील महिलांना वेगळे आरक्षण असावे, अशी मागणी पुढे येत गेल्याने त्याला काही पक्षांकडून विरोध होत गेला. आताही ती काही प्रमाणात असली, तरी सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडे असलेले बहुमत आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाचा त्याला नसलेला विरोध यांमुळे हे विधेयक मंजूर होण्याची शक्यता अधिक दिसते. संसदेच्या नव्या इमारतीतील विशेष अधिवेशनात 'नारीशक्ती वंदन अधिनियम' या नावाने आणलेले हे विधेयक 'ऐतिहासिक' असल्याचे आणि 'अशा कामांसाठी ईश्वराने आपली निवड केल्या'चे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे; परंतु ते मंजूर झाल्यानंतरही त्याची लगेचच अंमलबजावणी होऊ शकणार नाही. सध्याच्या मतदारसंघांच्या फेररचनेनंतरच ते प्रत्यक्षात येऊ शकेल. त्यासाठी आधी जनगणना घ्यावी लागेल. २०२१मध्ये कोव्हिडच्या कारणामुळे दशवार्षिक जनगणना झालेली नाही. साथरोग ओसरल्यानंतरही ती घेतली गेलेली नाही; तसेच ती येत्या सहा महिन्यांत घेण्याची शक्यता नाही. त्यामुळे, महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देण्यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतरही, २०२४ची निवडणूक या आरक्षणाविना होईल. असे असले, तरी या आरक्षणासाठी झालेली घटनादुरुस्ती महिलांना नवीन राजकीय अवकाश खुला करून देईल, यात शंका नाही.

वास्तविक, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण असल्याने त्यांच्यासाठी राजकीय अवकाश अगदीच नवीन नाही. ग्रामपंचायतींपासून महापालिकांपर्यंत महिला राजकारणात सक्रिय होण्यामागे हे आरक्षणच आहे. जेव्हा ते प्रत्यक्षात आले तेव्हा सुरुवातीला महिलांच्या आडून पुरुषमंडळीच कारभार पाहत होते, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महिलांसाठीचे राजकीय आरक्षण केवळ प्रतीकात्मकच असणार काय असा प्रश्नही उपस्थित केला गेला. आजही तो क्षीण आवाजात उपस्थित केला जातो; कारण काही ठिकाणी संबंधित महिलांचे पती किंवा इतर नातेवाइक कारभार पाहतात, अशी स्थिती आहे. मात्र, त्याचे प्रमाण आता कमी होत आहे. आपणही सक्षमपण कारभार पाहू शकतो, राजकीय निर्णय घेऊ शकतो, हे महिलांनी सिद्ध केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांत आरक्षण आले, त्याला आता तीन दशके उलटून गेली आहेत. या काळात समाजात स्थित्यंतर झाले असून, महिलांचे साक्षरतेचे, शिक्षणाचे आणि सार्वजनिक जीवनात वावरण्याचे प्रमाण वाढले आहे. शालेय परीक्षांपासून प्रशासकीय परीक्षांपर्यंत मुली अव्वल ठरत आहेत. प्रशासकीय सेवांपासून बँकांपर्यंत आणि संशोधन संस्थांपासून संरक्षण दलांपर्यंत विविध क्षेत्रांत महिला महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. एकूण लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण आणि कर्तबगारीचा चढत आलेख यांच्या तुलनेत त्यांना संसदीय राजकारणात मिळत नसलेले स्थान निश्चितच खटकणारे होते. महिला राजकीयदृष्ट्या सजग नसतात, असे म्हणणे पुरुषी अहंकार अधोरेखित करणारे ठरते. १९६२मध्ये मतदान करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण ६२ टक्के होते, तर महिलांचे प्रमाण ४६.६ टक्के होते; परंतु २०१९मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ६७ आणि ६७.२ टक्के होते. याचा अर्थ मतदान करणाऱ्या महिलांची संख्या वाढली. मात्र, या प्रमाणात महिला खासदार वाढले नाहीत. १९५२मध्ये २२ महिला खासदार (४.५ टक्के) होत्या, तर सध्या त्यांची संख्या ७८ (१४.३६ टक्के) आहे. ही संख्या एक तृतीयांश होणे आवश्यकच होते. त्यासाठी अखेर विधेयक मांडले गेले, ते योग्यच झाले.

## अद्भुत घटनांचा वेध घेणारी कादंबरी : महासम्राटांचा रणखैंदळ




छत्रपती शिवरायांच्या जीवनावर या आधी अनेक दिग्गज लेखकांनी बरेच लेखन केलेले आहे. छत्रपती शिवरायांच्या जीवनावर कादंबरीकार विश्वास पाटील 'महासम्राट' नावाची कादंबरी मालिका लिहीत आहेत म्हटल्यावर, त्या कालखंडातील अनेक अज्ञात गोष्टी, त्यात आजवर प्रकाशात न आलेले प्रसंग, दुर्लक्षित राहिलेल्या व्यक्तिरेखा नव्याने पटलावर आणतील ह्याची खात्री होती. विशेष म्हणजे कादंबरी लिहिताना एक चिकित्सक लेखक म्हणून देशी, परदेशी इतिहासकारांनी लिहिलेल्या कागदपत्रांचाही पुरेसा धांडोळा घेतातच, त्या व्यतिरिक्त महत्त्वाच्या घटना विशद करताना ज्या-ज्या परिसरात घडल्या, त्या-त्या परिसरांना अनेकदा जागरूकपणे भेटीही देतात. 'महासम्राट'चा 'झंझावात' हा पहिला भाग वाचून झाला तेव्हा ते अधोरेखित झाले.

'महासम्राट' या कादंबरीचा 'झंझावात' हा पहिला भाग मुख्यतः शिवरायांच्या जीवनाचे खरे शिल्पकार पिताश्री शहाजीराजे भोसले यांच्या कर्तृत्वावर प्रकाशझोत टाकतो. कथानकाचा ओघ वाहत असतानाच विजापूरची आदिलशाही, कुतुबशाही, दिल्लीची पातशाही आणि नंतर शिवरायांनी उभी केलेली मराठेशाही यांचे चित्रण डोळ्यांसमोर उभे राहतात. प्रतापगडावरील अफजलखान भेटीतील प्रसंगामध्ये शिवरायांचे विलक्षण बुद्धीचातुर्य आणि जावळीच्या परिसरातील पेटलेली सामान्य माणसं ह्यात वाचक गुंतून जातो.

कादंबरीमालिकेचा पहिला भाग 'झंझावात' अतिशय सरस उतरला आहे. पहिल्या पाच-सहा महिन्यांतच 'झंझावात'च्या तीस हजारांहून अधिक प्रती विकल्या गेल्या. झंझावात ही कादंबरी मराठीसह हिंदी (राजकमल प्रकाशन, दिल्ली), कन्नड (सपना, बंगळुरू) आणि इंग्रजी (वेस्टलँड, दिल्ली) या भाषांमध्ये प्रकाशित झाली होऊन ती बेस्ट सेलरही ठरली आहे. त्या पार्श्वभूमीवर पहिल्या भागातील कथानकाच वाहता ओघ 'रणखैंदळ' ही कादंबरी मालिकेतील दुसऱ्या खंडात कशी आणि कितपत टिकून राहील, याची उत्सुकता आणि आतुरता होती. आणि एकदाचा 'रणखैंदळ' हा खंड हाती आला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध केल्यानंतरच्या पार्श्वभूमीवर 'महासम्राट'चा दुसरा भाग असलेल्या 'रणखैंदळ' या कादंबरीची सुरुवात विजापूरच्या अभेद्य किल्ल्याभोवतीच्या भक्कम तटबंदीवर नेताजी पालकरांनी केलेल्या जोरदार हल्ल्याने होते. १६५८ मध्ये औरंगजेबाने आपल्या तीन लाखांच्या सैन्यासह विजापूरवर हल्ला केला होता आणि तेथे त्याचे प्रचंड सैन्य सुमारे बारा-तेरा महिने त्या अभेद्य भिंतीवर डोके आपटत राहिले आणि त्यात ते अयशस्वी ठरले होते. त्याआधी १० नोव्हेंबर १६५९ रोजी विजापूरच्या आदिलशाहीचा सरदार आणि शिवाजी महाराजांमध्ये झालेल्या संघर्षात शिवाजी महाराजांनी अफझल खानाला प्रतापगडाच्या पायथ्याशी कंठस्नान घातले होते. त्यानंतर चौथ्या दिवशी राजाच्या आज्ञेवरून नेताजी पालकरांनी अवघ्या पन्नास हजारांच्या फौजेसह विजापूरच्या अभेद्य दरवाज्यावर इतका जबरदस्त हल्ला चढवला होता की तो ध्वस्त झाला. शहरात एकच खळबळ उडाली. एखाद्या महाकाव्याला शोभेल अशी ही एक सत्य घटना आहे. 'पानिपत'कारांच्या कडून चित्रित झालेला हा प्रसंग वाचताना अक्षरश: अंगावर रोमांच उभे राहतात.

त्या व्यतिरिक्त ह्या भागात एकशे तेहतीस दिवस पन्हाळाच्या वेढ्यात छत्रपती शिवराय कसे अडकून राहिले. सह्याद्रीच्या अत्यंत खडतर अशा जंगलातील वाटा शिवरायांनी अवघ्या दीड दिवसात एकाद्या साहसी शेतकऱ्याप्रमाणे, घोडखिंड ते विशालगड दरम्यानचे सुमारे साठ किलोमीटरचे अंतर पायी चालत कसे पार केले हे पाहून आश्चर्य वाटते. या दरम्यानच्या प्रवासात घोडा किंवा पालखी वापरता येत नाही. कारण त्या जंगलातली वाट इतकी दुर्गम आहे की त्या वाटेवरून घोडा चालू शकत नाही. पालखी जाऊ शकत नाही. अर्थात लेखक श्री. विश्वास पाटील यांनी केलेल्या संशोधनाच्या व्यतिरिक्त सह्याद्रीच्या गडकिल्ल्यांच्या परिसरात त्यांनी वेगवेगळ्या ऋतुमानात केलेल्या अखंड भटकंतीमुळे कादंबरीतले हे प्रसंग वाचकांच्या डोळ्यांसमोर जिवंत उभे राहतात.



व्यंकटेश देवेनपल्ली बेंगळुरू

छत्रपती शिवरायांच्या जीवनातील कित्येक महत्वाचे टप्पे ह्या भागात अंतर्भूत करण्यात आले आहेत. हिंदवी स्वराज्यासाठी, छत्रपती राजांच्यासाठी पन्हाळच्या जंगलात आपल्या प्राणाची आहुती देणारे शिवबा काशीद, पहिले इस्लामी हुतात्मा सिद्दी वाहवाह, पावनखिंडीला पावन करणाऱ्या बाजीप्रभू आणि फुलाजी यांच्या शौर्यगाथा या भागात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. मराठा इतिहासातील प्रसिद्ध धनाजी आणि संताजीच्या आधी धनाजी जाधव यांचे वडील शंभूजी जाधव यांनीही पावनखिंडीत लढताना आपला जीव कसा धोक्यात घातला, शिवकाळातील अशा अनेक अभूतपूर्व घटना आणि अनेक शूर आणि समर्पित व्यक्तिरेखा आपल्या संशोधनाच्या बळावर लेखकाने वाचकांसमोर इत्थंभूत मांडलेले आहे.

शिवपट्टण ते पर्णाल पर्वतापर्यंत शिवरायांच्या शूर सहकाऱ्यांच्या घोड्यांची शर्यत, वेंगुर्ला-राजापूर, जैतापूरच्या दिशेने महासागराच्या खाडीकिनारी पसरलेला लढाऊ जनसमुदाय, हिंदवी स्वराज्याच्या स्वप्नपूर्तीसाठी बावीस वर्षे एकमेकांपासून दूर राहिल्यानंतर, शिवरायांची आपल्या पित्याशी जेजुरी गडावर मल्हारीरायांच्या देवळाच्या आवारात झालेली अभूतपूर्व भेट, शाहिस्तेखानावर थेट हल्ला करून त्याला पळवून लावणे, सुरत या सुवर्णनगरीत शिवरायांनी केलेली महालूट, उंबरखिंडीच्या जंगलात, झाडांमध्ये आणि डोंगरात लपलेल्या शिवरायांच्या मोजक्याच सैनिकांनी कारतलबखान आणि रायबाघनच्या सैनिकांना नि:शस्त्र करून कशी शरणागती पत्करायला लावली आणि शस्त्रे सोडून त्यांना कसे पळावे लागले, मुधोळच्या बाजीरावाचा वध, ह्या व अशा अनेक घटनांचा जबरदस्त मोठा कॅनव्हास ह्या भागात विश्वास पाटीलांनी त्यांच्या नेहमीच्याच विलक्षण पद्धतीने रंगवला आहे. शिवरायांच्या अतुलनीय शौर्याच्या अशा अनेक सत्य आणि आश्चर्यकारक घटना महासम्राटच्या दुसऱ्या खंडातल्या 'रणखैंदळ' या कादंबरीत पानांपानावर नोंदवलेल्या आहेत. शिवरायांच्या या सर्व कामगिरीमध्ये नेताजी पालकरांचा प्रत्यक्ष सहभाग होता हे प्रथमच नोंदले गेले आहे.

शिवरायांनी ५ नोव्हेंबर १६६४ ची कुडाळच्या लढाईत विजापूरचा तत्कालीन वजीर खवासखान याला अक्षरशः पळून जाण्यास भाग पाडले. त्यानंतर अवघ्या वीस दिवसांत २० नोव्हेंबर १६६४ त्यांनी महासागराच्या गर्भात शिवलंका नावाच्या सिंधुदुर्गाचा पाया घातला. मोठमोठ्या जगजेत्या वीरांच्या पंक्तीत अग्रभागी असलेल्या शिवरायांमध्ये प्रचंड जिद्द आणि ऊर्जा होती. शिवरायांच्या अतुलनीय व्यक्तिमत्त्वावर तसेच त्यांचे जिवलग सहकारी नेताजी, तानाजी, बाजी प्रभू, बहिर्जी आणि इतरांबरोबर असलेले त्यांचे नाते यावरही प्रकाशझोत टाकण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. कथनात असलेल्या वेगामुळे कादंबरीतली भाषा सुरूवातीलाच वाचकांच्या मनाची पकड घेते ती अखेरपर्यंत धरून ठेवते. पुस्तकाच्या अखेरीस संलग्न केलेली पन्हाळा, पावनखिंड, राजगड, उंबरखिंड, विजापूर, मुधोळ व सिंधुदुर्ग यांची रंगीत छायाचित्रे समाविष्ट केलेली आहेत. शिवप्रेमींसाठी ही कादंबरी मुळातूनच वाचण्यासारखी आहे. आता प्रतिक्षा आहे महासम्राटच्या तिसऱ्या खंडाची आणि त्यात गुंफलेल्या अद्भुत घटनांची आणि प्रसंगांची!

## कलार समाजाच्या पारंपारिक(मद्य) व्यवसायाचा सुध्दा सरकारने गांभीर्याने विचार करावा

अशा परिस्थितीत कलार समाजाला सरकारने तोंडाला पाणे पुसल्या इतके फक्त १ टक्के दारूचे परवाने दिले व ९९ टक्के कलार समाज बांधवांना वाऱ्यावर सोडले आणि कलार समाजाचे हिसकावलेले ९९ टक्के परवाने राजकीय पुढारी,त्यांचे नातेवाईक व पुंजीपती यांना परस्पर वाटुन दिले आणि सरकारने विश्वासघात केला.अशाप्रकारे कलार समाजाच्या पारंपरिक व्यवसायावर घनाघाती प्रहार त्यावेळेस करण्यात आला व कलार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाचा लाभ पहातां पुंजीपतींनी कलार समाजाच्या व्यवसायवर झडप घातली व संपूर्ण व्यवसाय समाजापासुन हिसकावला.राज्यात सध्याच्या परिस्थितीत आरक्षणाचा मुद्दा मोठा जोर पकडुन आहे.त्यामुळे संपूर्ण समाज आरक्षणाच्या कुंडात उतरल्याचे दिसून येते.यात सरकार व सर्वच पक्षांचे राजकीय पुढारी आपापल्या पद्धतीने राजकीय पोळी शेकण्याचे काम करीत आहे.सरकार एकीकडे मराठा समाजाला निजामकालीन वंशावळी मागत आहे, त्यामुळे कलार समाजाला प्रश्न आहे की स्वतंत्रपुर्व काळातील कलार समाजाचा पारंपारिक(मद्य)व्यवसाय समाजाला परत का करीत नाही?सरकार सध्या मराठा समाजाचा आरक्षणाच्या मुद्द्यावर असमंजस्यतेमध्ये आल्याचे दिसून येते.परंतु मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे या मताचा मी आहे.परंतु त्यांना ओबीसींच्या आरक्षणातुन आरक्षण देवु नये याकरिता कुणबी व संपूर्ण ओबीसीं समाज एकवटला आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात आरक्षणाचा मुद्दा सुध्दा अत्यंत जटिल परिस्थितीत आहे.

कलार समाजाने अनेकदा आवाज उचलला की सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी करावी अन्यथा कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय परत करावा.जर महाराष्ट्रात दारू बंदी होत असेल तर कलार समाज त्याचे स्वागतच करेल. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी लागू करावी अन्यथा कलार समाजाला त्याचा पारंपारिक (दारूचा व्यवसाय) ५० टक्के परत करावा. कलार समाजाला खात्री आहे की आज प्रत्येक समाज आपल्या हक्कासाठी लढत आहे.महाराष्ट्रातील संपूर्ण कलार-कलाल समाजाने एकत्र येऊन आपल्या पारंपारिक व्यवसायासाठी आता संघर्ष करणे अत्यंत गरजेचे आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आपणांस आग्रह आहे की पारंपारिक व्यवसायाच्या माध्यमातून पीएम विश्वकर्मा योजने अंतर्गत कलार समाजाचा पारंपारिक दारूचा व्यवसाय महाराष्ट्र सरकारने कलार समाजाला कमीत कमी ५० टक्के परत करावा यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.कारण महाराष्ट्रात कलार समाजाची संख्या ३० लाखांच्या वर आहे.त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की पीएम विश्वकर्मा योजने अंतर्गत कलार समाजाचा पारंपारिक दारूचा व्यवसाय परत करण्यास मदत करावी व गांभीर्याने विचार करून योग्य निर्णय घ्यावा.आम्हाला आशा आहे की केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार यावर अवश्य विचार करून कलार समाजाला दिलासा देतील.



रमेश लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.९९२१६९०७७९

समाप्त:

## शब्दकोडे-१८४



**आडवे शब्द**

१. शिकार ३. सावकारी पाशात अडकलेला ६. अंदाज ८. धपाटा ९. कोवळी फांदी ११. शोधकार्य १३. थोडक्यात महत्तम साधारण विभाजक १५. राग, चीड १७. कपाळ १८. लांब वासा १९. राग, क्रोध २१. पदार्थ शिजतानाचा आवाज २२. पाठवणी २४. पारंब्याचा एक वृक्ष २५. दंडुकेशाही याच्या जोरावर चालते २६. आकाश २७. पंचवीसावा वर्धापनदिन २९. हिंदीत इच्छा-आकांक्षा ३०. जाळणे ३२. वर्तमानपत्रातील स्तंभ ३३. दरवाजा ३४. महादेव, मदन, कोणी याला मारुतीपुत्र म्हणूनही ओळखतात ३६. 'मधुबन में राधिका नाचें रे' गाण्यात दिलीपकुमारच्या हाती दिसलेले तारवाद्य ३८. युद्ध गाजविणारी स्त्री ४०. फक्त, केवळ ४१. विहीर ४२. फोटो ४४. खुंटी, मेख ४६. नव्या संसारात 'तो' आणि 'ती' ४८. शब्दाचे वजन ४९. भरपूर बियांचे आंबटगोड फळ ५१. अंगाची आगआग, उष्णता ५३. बारसे ५५. आरोप ५६. टिंगल ५८. चांदण्याचा ऋतू ६०. चणचण ६३. माकडांना खेळविणारा ६५. पड खाण्याचा स्वभाव ६८. पवित्र ६९. रवाळ ७०. पीठ एकजीव करण्यासाठी वापरले जाणारे तेल ७२. मलई ७३. सोयाबीनच्या टिकाऊ वड्या ७४. भारत-पाकिस्तानमधून वाहणारी एक नदी ७५. शक्ती ७६. चांदीच्या वजनदार रुपयाचे विशेषण ७७. शेतीवाडी

**उभे शब्द**

१. जाणकार, परीक्षक, मर्मज्ञ २. व्यवस्थित ३. वेदना ४. भोट ५. पद्धतीशीर ६. सत्व ७. समानता ८. सूर्य १०. अधाशी, लालची १२. मर्यादा, सीमा १४. सर्प १६. जन्ममृत्यू १७. हमाल १९. गाण्याला चाली देणारा २०. समारंभासाठी घातलेला शमियाना २३. टक, दृष्टी २४. प्रेमळपणा, वात्सल्य २५. मत देणारा २५अ. हिंदीत ऊस २८. बंदी, मज्जाव ३०. छोटी बैलगाडी ३१. असह्य वेदना ३५. विद्युत निर्माण करणारे यंत्र ३६. सडसडीत ३७. रुक्ष, कोरडे ३९. चक्की ४२. ठसा, प्रभाव ४३. दिशांची संख्या ४५. अस्थिर संपत्ती ४६. संतापी ४७. श्रावणी पौर्णिमेचे वैशिष्ट्य ४९. हात ५०. जंगलात लागलेली आग ५२. वक्ष, छाती ५४. थडगे, कबर ५५. कुंभाराची भट्टी ५७. रम्य, मनोहर ५८. देह ५९. मसाल्यातील फूल ६१. नित्यनूतन ६२. किंमत, दर ६४. मोठा भाऊ ६६. मोदकासारखा सारण भरून केला जाणारा पाश्चात्त्य पदार्थ ६७. चरण ६८. आश्चर्य ६९. गुरांची कत्तल करणारा ७१. विश्वासघातकी ७३. अग्र ७६. संकट

### शब्दकोडे १८३ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.सुधारक ४.हरणटोळ ७.पनवती ९.धाक १०.पारायण ११.कसारा १२.खीळ १३.गदारोळ १५.गंगोदक १७.मंथरा १८.पायल २०.रखवालदारी २१.आत २२.हाक २४.करंगळी २४अ. नस २५.कळक २७.वार २८.कसरत ३०.वळकटी ३३.हकनाक ३५.सहा ३६.डफ ३८.शीर ३९.नग ४०.रीत ४१.गोदान ४२.काळजी ४४.दानवीर ४५.नातलग ४७.गोफ ४८.वदंता ५०.नभ ५१.गडप ५४.नग ५६.कप्पा ५७.कीर ५९.मानिनी ६१.पखवाज ६३.कमला ६४.प्रतिवादी ६६.रमारम ६७.हास्यास्पद ७०.शर ७२.पाणलोट ७३.तनय ७४.अंगतपंगत ७५.करामत

**उभे उत्तर**

१.सूचनामंत्री २.धारा ३.कपाळ ४.हयगय ५.रण ६.टोकदार ७.परागंदा ८.तीरकमठा ११.पळवापळव १२.खीरा १४.रोख १६.गोरीगोमटी १८.पातळी १९.लहानसहान २१.आगळीक २३.कसर २४.करकरीत २६.कळशी २७.वाह २८.कसदार २९.तडकाफडकी ३१.करदाता ३२.नगरभवानी ३४.नातलग ३७.फळ ४३.जीवन ४५.नापाक ४६.गड ४९.दंगलेला ५२.पदोपदी ५३.शनिवार ५५.अमावस्या ५८.रकमपात ६०.अतिशय ६२.जमा ६५.वार ६७.हाटक ६८.ददात ६९.प्रांत ७१.आग

## सोभाव (सुत्र ९)
## मन आनी सोभाव



मननी सहजावस्था हायी निर्यापार जशी वाटस तशी ती खरी व्यापारक्षम शे.मननी हायी सहजावस्था जितली दीर्घ काय टिकाडाकरता धाकलपनपासूनच प्रयत्न करना पडतस.तेवढं मन धीरगंभीर आनी खंबीर बनस.आवाजना बालमनवर संस्कार व्हस. हायी मननी सहजावस्था दीर्घकाय म्हन्जे सुरवातले आवाज ध्वनी जितला चालेत तितला येय तरी टिकाडता येस.गान बंद व्हतास पोरगं रडाले लागस.ते काही त्याले गावं समजस म्हनीसनी रंगानं थांबाडस का? तसं नै.त्या गानाना आवाज त्यांनी सहजावस्था व्यक्त व्हस आनी आवाज बंद व्हताच ती त्यानी अवस्था नष्ट व्हई जास आनी तो रडाले लागस.त्या गानानानुसार आवाज त्या तान्हा पोरसन्या कानवर सतत अधाईमधाई घालत जावो म्हन्जे तो पुढे मनना खंबीर व्हवाले जोयजे.यादृष्टीनाकरता महत्त्वान शे.हायीच मननी निर्व्यापार सहजावस्था धाकलपने,बालपनी जितली जास्ती पोसावस तितली त्यानी मननी स्थिती मजबूत व्हईसन प्रतिकारक्षम बनस.हाई सहजावस्था जितली कमी पोसावस तितली त्यानी मननी स्थिती कमजोर व्हस जास.तो भितरा ईकारी, चंचल, कोनत्याबी गोष्टी कराले धजत नै.रममान व्हत नै.पन पोरगं एकदाव बोलाले लागन ते मंग त्या ध्वनीना आवाजना परिनाम त्याना मनवर जसा व्हवाले जोयजे तसा व्हय नै.पुढेपुढे ते संगीत आयकताना बी हाई सहजावस्था पूर्ववयमा पोसायल न राव्हामुये ती व्यक्त व्हत नै. या मनन्या सहजावस्थावर जीवनन समद भविष्य अवलंबी -हास हायी खरं, पन हाईच गोट परसोधीन दुसरावर अवलंबून -हावामुये तीना गोटकडे पालकसनी पोरगं तान्ह-हास तधयच जास्तीन ध्यान ठेवाले जोयजेल.मनभितरं,ईकारी आनी चंचल असंझाये म्हन्जे. सोकष्टार्जित सोभाव बनवनं मोठं जिकरीनं काम व्हई बठस.कारन पुढे मन आनी देह यासन्या प्रेर्यप्रेरक संबंधवर बुध्दीना संस्कार होन हाई जास्ती गरजन -हास.त्या संस्कार ईकारस्न्या तीव्रतामुये व्हऊच शकत नैत.पुढेपुढे मन आनी देह या जर बुध्दीले सापेक्षी -हाईसन एकमेकले प्रेरना देत -हायनात ते सोभाव एकदम चांगला बनाडता येस.असा मानूस जनमभर परिस्थितीना गुलाम -हात नै.तर तो परिस्थितीले गुलाम बनाडस.नै ते मन कच्च -हाईसन बुध्दीनी वाढ झायी असं देखाले मियस.पन असा मानूस सोताना मनपरमाने सोता वागत -हास असं कधीच घडतं नै. तो सोता सामर्थ्यवान व्हत नै.आनी या जानीवना त्याना ठिकानेच कमी पनानी उनीव निरमान व्हस आनी एकलकोंडा राव्हाना करता धडपड करस. तेच त्याले बी पसंत पडस.त्याना ईचार, माहिती आनी ज्ञान यांना त्यावर आनी त्याना सोभाववर आनी वागानी रीतवर त्याना कधीच मेय बसत नै. तो समाजना कायम तिरस्कार करस.हाऊ त्याना ईषय पक्का व्हस.म्हनीसनी धाकलपने त्यानी मननी हाई निर्व्यापार अशी सहजावस्था कशी पोसाले जोयजे व ती जर पोसायनी नै ते ज्याले सोताना सोभाव तयार कराना -हास त्याले तीनी जानीव धरीसन ती कशी त्याले प्राप्त व्हईन त्यासाठे त्याले जास्तीना प्रयत्न शील -हानं पडी हाई जानकारले ईचाराले जोयजे.

– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले. **'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४. **नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

### नाशकात गणरायाचे जल्लोषात स्वागत

**नाशिक ।** आज राज्यभरात गणपती बाप्पाचे आगमन होत असून सगळीकडे गणेशभक्त घरोघरी ढोलताशा आणि गुलालाची उधळण करत गणपती बाप्पा मोरया मोरयाच्या गजरात जल्लोषात स्वागत करत आहेत. त्यामुळे राज्यात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर नाशिक शहरात देखील गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात आगमन झाले असून सर्वत्र ढोल ताशांचा गजर ऐकायला मिळाला. गेल्या तीन दिवसांपासून नाशिक शहरातील बाजारपेठ गणपतीची खरेदी करण्यापासून ते सजावटीचे साहित्य विकत घेण्यापर्यंत गर्दीने फुलून गेल्याचे चित्र पाहायला मिळत होते. यानंतर आज सकाळपासून घरोघरी गणपती बाप्पाच्या आगमनाने उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. शहरातील काही छोट्या-मोठ्या मंडळांनी त्यांच्या भव्य गणेश मूर्तींना सोमवारी ढोल ताशांच्या गजरात मंडपात आणले. यावेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी लेझीमचा नृत्याचा फेर धरत गणरायाचे जोरदार स्वागत केले.

# सिन्नर तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या नदीजोड प्रकल्पाची राज्य मंत्रिमंडळात घोषणा

## निधीसाठी प्रस्ताव लवकरच केंद्राकडे जाणार : खा. गोडसे

**सिन्नर । प्रतिनिधी**

राज्यातील तीन नदी जोड प्रकल्पांना औरंगाबाद येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पांसाठी चौदा हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. या तीन नदीजोड प्रकल्पात सिन्नर तालुक्याचा दुष्काळी तालुका हा कलंक कायमचा पुसल्या जाणाऱ्या दमनगंगा - अप्पर वैतारणा - कडवा - देवलिंग या नदीजोड प्रकल्पाचा समावेश आहे. दमणगंगा -अप्पर वैतरणा - कडवा - देवलिंग या नदीजोड प्रकल्पास आता लवकरच राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता मिळणार असून निधी उपलब्धतेसाठी नदीजोड प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्राकडे सादर केला जाणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिली आहे.

सिन्नर तालुका वर्षानुवर्षे दुष्काळी तालुका म्हणुन प्रसिद्ध असल्याने या तालुक्यात कायमच पिण्याच्या, सिंचनाच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न असतो. या तालुक्यातील पाणी टंचाईचा प्रश्न कायमचाच निकाली निघावा यासाठी खा.हेमंत गोडसे यांनी गेल्या काही वर्षांपासून शासन दरबारी प्रयत्न सुरू केले होते. वैतरणा खाडीतून समुद्रात वाहून जाणारे पाणी अडवून हे पाणी गोदावरी खोऱ्यात टाकल्यास सिन्नर तालुक्यासाठी साडे सहा टीएमसी पाणी उपलब्ध होवू शकेल हे खा.गोडसे यांनी जलचिंतन संस्थेचे अध्यक्ष इंजिनिर राजेंद्र जाधव यांच्या सहकार्याने राज्य शासनाच्या वेळोवेळी निदर्शनास आणुन दिले. याकरीता आ. माणिकराव कोकाटे यांनीही मागील सरकारच्या काळात तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता. शासनाने काही दिवसांपूर्वी नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट थोरिटीन या कंपनीकडून प्रस्तावित अप्पर वैतरणा - कडवा - देवलिंक नदीजोड प्रकल्पाचे सर्वेक्षण आणि डिपीआर तयार करून घेतला होता.



कंपनीने नदीजोड प्रकल्पाचा साडेसात हजार कोटींचा अंतिम अहवाल पंधरा दिवसांपूर्वी शासनाला सादर केला होता. औरंगाबाद येथे नुकत्याच झालेल्या कॅबिनेट बैठकीत दमणगंगा -अप्पर वैतरणा - कडवा - देवलिंक या नदीजोड प्रकल्पासह दमनगंगा -एकदरा -गोदावरी आणि पार -कादवा-गोदावरी नदीजोड प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पांसाठी चौदा हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार आदीसह सर्वच मंत्रीगण उपस्थित होते. या तीनही नदीजोड प्रकल्पांमुळे चौदा टीएमसी अधिकचे पाणी उपलब्ध होणार असून याचा फायदा नासिक, नगर आणि मराठवाड्याला होणार आहे. अप्पर वैतारणा -कडवा -देवलिंक या प्रकल्पास राज्य सरकारने मान्यता दिल्यामुळे आता लवकरच या प्रकल्पास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीची मान्यता मिळणार असून सदर प्रकल्पाचा प्रस्ताव निधीसाठी केंद्र शासनाकडे जाणार असल्याची माहिती खा.गोडसे यांनी दिली आहे.

आता दमनगंगा -अप्पर वैतारणा -कडवा -देवलिंक या महत्वकांक्षी प्रकल्पाची प्रतिक्षा लवकरच संपणार असून प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू होवून येत्या काही वर्षात सिन्नर तालुका सुजलाम सुफलाम होणार असल्याचा विश्वास खा. गोडसे यांनी व्यक्त केला आहे.

# सिडकोला उच्च न्यायालयाचा दणका

### प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना व्याजासह मोबदला देण्याचे आदेश

**सिडको । प्रतिनिधी**

गेल्या ४२ वर्षांपासून सिडको सोबत सुरु असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला यश आले असून उच्च न्यायालयाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल देत दोन महिन्यांच्या आत त्यांचे पैसे व्याजासह परत देण्याचे आदेशित केल्याची माहिती ड.अनिल आहुजा यांनी पत्रकार परिषदेत दिली. यामुळे आता सिडकोसह शासनाचे मात्र कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार आहे.

सिडको प्रशासनाने १९८१ साली मोरवाडी, उंटवाडीसह कामटवाडे गावाचा काही भाग असे भू संपादन केले होते. त्यावेळेपासून जागेच्या भावाबद्दल न्यायालयीन लढाया लढल्या गेल्या. त्यानंतर न्यायालयाने सिडकोला दर निश्चित करून दिला होता. मात्र सिडकोने देखील न्यायालयात धाव घेत शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित होता. यावर ५८ शेतकऱ्यांपैकी १७ शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत दाद मागितली होती. यावरून उच्च न्यायालयाने सदरहू १७ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देत त्यांच्या बाजूने निकाल देत येत्या दोन महिन्यांच्या आत त्यांचे पैसे व्याजासह अदा करण्याचे आदेशित केले आहे. यावर जर सिडकोने जर सदरहू प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पैसे अदा न केल्यास न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी पुन्हा याचिका दाखल करण्यात येऊन जप्तीच्या कारवाईसाठी पुढील प्रक्रिया करण्याचे ड.आहुजा यांनी सांगितले. यावेळी नानासाहेब महाले, केशवराव पाटील, दत्ता पाटील, राजेश गाढवे, लक्ष्मण जायभावे आदी उपस्थित होते.

# शेफ जनजागृतीसाठी भारत भ्रमंती करणारा शेफ ॲलन डीमेलो नाशिक शहरात

### अँम्रो इन्स्टिट्यूटतर्फे जल्लोषात स्वागत : शेफ राईडचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

अँम्रो इन्स्टिट्यूट हॉस्पिट्यालिटी इंडरस्ट्रीज मधील शिक्षण देणारे हे प्रथितयश नाव असून २० ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय शेफ डे जगभरात साजरा केला जातोय. त्या निम्मिताने अँम्रो इस्टीट्युटने भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. अँम्रो इन्स्टिट्यूटसचे संस्थापक अध्यक्ष स्व.राजन सोनी यांच्या जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. शेफ जनजागृतीसाठी भारत भ्रमंती करणारा शेफ ॲलन डीमेलो यांचे जंगी स्वागत अँम्रो इन्स्टिट्यूटच्यावतीने इंस्टीट्युटच्या प्रांगणात केले होते. यावेळी शेफ राईडचे आयोजन करण्यात आले.




शहरातील मुख्य चौकातून सुरु झालेल्या राईडचा शेवट अँम्रो इन्स्टिट्यूट येथे करण्यात आला. या विविध उपक्रमात नाशिक मधील नामांकीत हॉटेलचे शेफ आणि व्यवस्थपक सहभागी झाले होते. हॉटेल गेटवे, एक्सप्रेस इन्, बीएलव्हीडी, जिंजर, सुला यांच्यासह अन्य हॉटेलसचे व्यवस्थापक आणि शेफ सहभागी झाले होते. एसआरके किचनचे शुभांकर आनंद, क्रूझिंग गॉड्सचे प्रेसिडेंट मार्कंड उदावंत यांची टीम देखील कार्यक्रम आयोजनात अम्रो इन्स्टिट्यूट सोबत आहेत. तिरुवनथमपूरम येथून शेफ ॲलन डीमेलो यांनी १ सप्टेंबरपासून शेफ जनजागृतीसाठी भारत भ्रमंतीसाठी सुरुवात केली आहे. ३५०० किलोमीटर प्रवास शेफ ॲलन डीमेलो हे करणार आहेत. भारतातील ११ प्रमुख शहरांना ते भेट देत आहेत. तर दि. २० ऑक्टोबर आंतरराष्ट्रीय शेफ डे रोजी त्यांच्या भ्रमंतीचा समारोप होणार आहे. दरम्यान त्यांच्या प्रवासात मंगलोर, गोवा, पांचगणी, सुरत, नाशिक वडोदरा, अहमदाबाद आणि राजकोट या प्रमुख शहरांचा समावेश आहे. एक्स इव्हेंट हॉस्पिट्यालिटी या चळवळीचे ते संस्थापक आहेत.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अँम्रो इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा. सुनंदा सोनी आणि डॉ. रोहन सोनी यांच्या मार्गदर्शनाखाली अँम्रो ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस् सायन्स अँड कॉमर्सचे प्राचार्य डॉ.गिरीश पाटील, प्रा. रीना सोनी, प्रा. योगेश जोशी, प्रा. गौरव दीक्षित, प्रा. शिवदास काळे, प्रा. पंकज शर्मा, अधीक्षक भाविका सोनी, ग्रंथपाल मनिषा आष्टीकर, कार्यालय प्रमुख कांचन संसारे, रतन गोडसे यांनी परिश्रम घेतले.

# आ. सीमा हिरे यांच्या हस्ते भाजप कार्यालयात श्री गणेशाची स्थापना



**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी नाशिक महानगर कार्यालय वसंतस्मृती येथे आ. सीमा हिरे यांच्या हस्ते श्री गणेश प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, उपाध्यक्ष पवन भगुरकर, सरचिटणीस सुनील केदार, शरद कासार, नाना शिलेदार, रोहिणी नायडू, नाशिक पश्चिम विधानसभा निवडणूक प्रमुख राजेश दराडे, मध्य विधानसभा निवडणूक प्रमुख अनिल भालेराव, जेष्ठ नेते विजय साने, अरुण शेंदुर्णीकर, विजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### येवला तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

**नाशिक ।** देवळाली मतदारसंघाचे माजी आमदार व शिवसेना ठाकरे गटाचे नेते योगेश घोलप यांनी मुंबई येथे महाविकास आघाडीचे नेते शरद पवार यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. तसेच ही केवळ सदिच्छा भेट होती अशी माहिती योगेश घोलप यांनी दिली. गेल्या आठ दिवसांपासून शिवसेना उपनेते व माजी मंत्री बबनराव घोलप यांनी शिवसेना उपनेते पदाचा राजीनामा दिल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. घोलप यांचा राजीनामा ठाकरे गटाच्या पक्षश्रेष्ठींनी स्वीकारला नसला तरी त्यांना वेट अँड वॉच ठेवले आहे. तसेच त्यांना चर्चेसाठी मातोश्रीवरून अद्यापही निरोप अथवा फोन आला नसल्यामुळे घोलप यांच्या समर्थकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून स्वतः घोलप सुद्धा याबाबत नाराज आहे.

**जाहिर नोटीस**
**मे. दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो., अमळनेर, जि. जळगांव येथील यांचे कोर्टात**

संप्रमाण अर्ज ०१/२०२३
पु. ता. ३१/१०/ २०२३
निशाणी -०६

सिमा अशोक देसले ...वादी
॥ विरुध्द ॥
कोणीही नाही ...प्र. वादी

मृत्युपत्राअन्वये प्रोबेट मिळण्यासाठी अर्ज
उपरोक्त अर्जदार यांनी मौजे अमळनेर जळोद शिवारातील गट नं ६२९ क्षेत्र ७५ आर ही शेतजमीन व पातोंडा ग्रामपंचायत हददीतील ग्रामपंचायत घर नं ६७४ क्षेत्र ४७ चौ.मी. (५०० चौ. फुट ) बांधकाम केलेले घर या मिळकतीसाठी उपरोक्त अर्जदार यांनी दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अमळनेर येथे अर्ज दाखल केला आहे.
तरी या मिळकतीबाबत कोणास काही म्हणायचे असल्यास त्यांनी दिनांक ३१/१०/२०२३ रोजी ठिक ११.०० वाजता दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अमळनेर येथे स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. त्यात कसूर झाल्यास अर्जाचे कामी पुढील आदेश पारीत करण्यात येतील.
येणेप्रमाणे सदरची जाहीर नोटीस आज दि. ११/०९/२०२३ रोजी माझे सहीनिशी व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.
हुकूमावरून,

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व.स्तर, अमळनेर, जि.जळगांव (शिक्का) सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, अमळनेर, जि. जळगांव

# महिलांना ३३ टक्के आरक्षण दिल्याबद्दल मोदी सरकारचे अभिनंदन

**नाशिक । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण घोषित केल्याबद्दल आ. सीमा हिरे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते यांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला. यावेळी आ. हिरे यांनी मोदी सरकारचे अभिनंदन करून महिलांना मानसन्मान वाढवून नारी सशक्तिकरणासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक ग्रामीण दक्षिणचे अध्यक्ष सुनील बच्छाव, आ. राहुल ढिकले, मध्य विधानसभा निवडणूक प्रमुख अनिल भालेराव, नाशिक लोकसभा निवडणूक प्रमुख केदा आहेर, दिंडोरी लोकसभा निवडणूक प्रमुख बाळासाहेब सानप, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, नाशिक पश्चिम विधानसभा निवडणूक प्रमुख राजेश दराडे, महेश हिरे, नाशिक महानगर सरचिटणीस काशिनाथ शिलेदार, श्याम बडोदे, नाशिक ग्रामीण दक्षिण सरचिटणीस शरद कासार, महानगर सरचिटणीस सुनील केदार, भाजपा ज्येष्ठ नेते विजय साने, तनुजा घोलप, सीमा झोले आदी यावेळी उपस्थित होते.



# फॅमिली फिजिशियन असोसिएशनचा वार्षिक उजळणी वर्ग उत्साहात

**सिडको । प्रतिनिधी**

फॅमिली फिजिशियन असोसिएशन यांच्या वतीने हॉटेल ग्रँड रिओ येथे वार्षिक उजळणी वर्ग अतिशय उत्साहात व आनंदाच्या वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून नासा हनीवेल स्पेस एज्युकेटर अपूर्वा जाखडी या उपस्थित होत्या.

तसेच फॅमिली फिजिशियन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विनय मोगल, सचिव डॉ. शितल सुरजुसे व खजिनदार डॉ. विजय मुंदडा, माजी अध्यक्ष डॉ. पंकज देवरे व असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. वेगवेगळ्या विषयावरील वेगवेगळ्या तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन यावेळी लाभले. असोसिएशनच्या सदस्यांची उपस्थिती लक्षणीय होती. प्रमुख पाहुण्या अपूर्वा जाखडी यांनी चंद्रयान ३ व स्पेस बद्दलचे अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन करत माहिती दिली. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विनय मोगल यांचे अध्यक्षीय भाषण झाले. सचिव डॉ. शितल सुरजुसे व डॉ. विजय मुंदडा यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्याचबरोबर असोसिएशनच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार डॉ. अरुण पाटील व डॉ. कृष्णा कोठावदे, तसेच कृतज्ञता पुरस्कार डॉ. प्रमोद आहेर यांना प्रमुख पाहुणे व असोसिएशनचे अध्यक्ष यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अविनाश पवार, डॉ. ज्योती पाटील त्यांनी अतिशय उत्तमरीत्या पार पाडले. तसेच जीवनगौरव पुरस्काराचे सूत्रसंचालन असोसिएशनचे डॉ. मनीष पवार, डॉ. प्रियंका बेंडाळे व कृतज्ञता पुरस्काराचे सूत्रसंचालन डॉ. रुपेश मर्दा यांनी केले. तसेच या कार्यक्रमास सर्व कार्यकारिणी व माजी अध्यक्ष यांनी चेअरमन व को-चेअरमन म्हणून जबाबदारी सांभाळली. तसेच सुसंस्कृती फाउंडेशन यांचेही सहकार्य लाभले.



### टेंम्पोतून ९ लाख रुपयांचे बूट चोरीला

**सिडको । प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा महामार्ग लगत उभ्या असलेल्या टेम्पोमधून अज्ञात चोरट्याने सुमारे नऊ लाख रुपयांचे बाटा कंपनीचे बुट चोरून नेल्याचा प्रकार घडला.

राधेश्याम मकरंद सिंग (६०, रा. फ्लॅट नंबर २०१, डी विंग, रिध्दी सिद्धी कॉम्प्लेक्स, रेतीबंदर रोड, काल्हेर, भिवंडी, जिल्हा ठाणे) यांचा टेम्पो मुंबई-आग्रा महामार्गावरील एमएनजीएल सीएनजी पेट्रोल पंपाच्या पुढे हायवेच्या कडेला रात्री अकरा वाजेच्या दरम्यान उभा होता. दरम्यान गाडीचा ड्रायव्हर हा गाडीत झोपला असताना अज्ञात चोरट्यांनी बाटा कंपनीचे बुट गाडीतून लंपास केल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ॲड. गोविंद बी. साखरे, धुळे
निशाणी नं. २०

**जाहिर नोटीस**
**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो॥ व.स्तर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज क्र.१०७३/२०२३
१. मोहसीनोद्दीन मुविनोदीन काझी उ. व. ६५, धंदा - सेवानिवृत्त, रा. प्लॉट नं. २८, मुल्ला कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे, ता. जि. धुळे
२. मकसूद अजीम मोहसीनोद्दीन काझी उ.व.-३०, धंदा - खाजगी नोकरी,
३. शादाब मोहसीनोद्दीन काझी उ. व २७, धंदा - खाजगी नोकरी.
दोघे रा. प्लॉट नं. २८. मुल्ला कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे, ता. जि. धुळे
नुरुस्सवा मर्द जियाऊर रहेमान सैय्यद उ.व.-३३, धंदा - घरकाम, रा. अपनी बेकरी जवळ, चाळीसगाव रोड, धुळे, ता. जि. धुळे ...अर्जदार

॥ विरुध्द ॥
कोणीही नाही ...सामनेवाला

फरहत आरा सैयद अब्दुल वहाब (मयत) (लग्नापुर्वीचे नाव)
फरहत जहा मोहसिनोद्दीन काझी (मयत) (लग्नानंतरचे नाव)
मृत्यु दि. १६/०३/२०२१
मृत्यु समयी पत्ता : धुळे, ता. जि. धुळे. ...मयत

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो॥ क.स्तर यांचे न्यायालयात दि. ४/९/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं १०७३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ हे फरहत जहा मोहसिनोद्दीन काझी (मयत) यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय व इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने सदरहु वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०४/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो॥क.स्तर कोर्ट नं. ५ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.
ठिकाण :- धुळे
दिनांक :- १५/०९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं. (शिक्का) अधिक्षक, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

## न्यूज कॉलम

### माध्यमिक विद्यालय कुंडाणे, तांडा कुस्ती संघाची विभागस्तरावर निवड

**धुळे ।** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे धुळे क्रीडासंकुल येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत माध्यमिक विद्यालय कुंडाणे, तांडा येथील विद्यार्थिनींनी विजय मिळविला. स्पर्धेत माध्यमिक विद्यालयातील १४ वर्षाखालील गटात साधना सोमनाथ चव्हाण व १७ वर्षाखालील गटात दर्शना मच्छिंद्र पवार यांनी बाजी मारली. त्यांची विभागस्तरील स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडाशिक्षक सचिन सोनवणे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. डी. बी. पाटील, उपाध्यक्ष डॉ. आदित्य पाटील, सचिव व मुख्याध्यापिका छाया पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

..............................

### रोजगार मेळाव्याचे आयोजन

**धुळे ।** जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांच्याकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने थेट नियुक्तीसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन २१ रोजी केले आहे. प्रशासकीय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे १० ते १२ वाजता मेळावा होईल. आयटीआय उमेदवाराकरिता एकूण ९ रिक्तपदे प्राप्त झाली आहेत.

# स्वागताला सज्ज सुवासिनी : गणरायांपाठोपाठ आज गौरींचे आगमन

**धुळे । प्रतिनिधी**

विघ्नहर्त्या मंगलमूर्तीचे विधिवत, वाजतगाजत आगमन झाल्यावर आता गुरुवारी (ता. ३) गौरीचे विधिवत आगमन होत आहे. मुखवट्यापासून सुगडे, खडी व अन्य साहित्याच्या खरेदीसाठी शुक्रवारी बाजारात महिला वर्गाची मोठी गर्दी उसळली होती. राज्याच्या वेगवेगळ्या भागात ज्येष्ठा गौरीचे पूजन वेगवेगळ्या पद्धतीने केले जाते.

अखंड सौभाग्य प्राप्तीसाठी महिला वर्गाकडून हे व्रत केले जाते. भाद्रपद महिन्यात येणाऱ्या या उत्सवात घरात किंवा देवघरात गौरीचे जोडीने आगमन होते. अनुराधा नक्षत्रावर आवाहन, ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन तर मूळ नक्षत्रावर गौरीचे विधीवत विसर्जन केले जाते. हे तीन दिवसीय व्रत महिला वर्ग मोठ्या भक्तिभावाने करतात. आर्थिक कुवतीनुसार सोन्या-चांदीचे, तर काही ठिकाणी आकर्षक मुखवटे आणून गौरींना साजशृंगार करण्याची पद्धत आहे. कागदावर केवळ गौरीचे चित्र काढूनही काही ठिकाणी पूजन केले जाते, तर काही ठिकाणी नदीपात्रातून खडे व दगड आणूनही पूजन करण्याची पद्धत आहे. गौरीच्या नैवेद्यासाठी सोळा भाज्या, डांगराची फुले, कमलपुष्प आदींच्या खरेदीसाठी बाजारात खरेदीसाठी महिला वर्गात मोठा उत्साह होता.



### गौरीचे अनेक प्रकार

**गौरीचे अनेक प्रकार पहायला मिळतात. कुठे साधी तेरड्याची, तर कुठे कागदी मुखवटा लावून टोपलीत बसलेली तर कुठे पूर्णाकृती गवार तसेच खुर्चीवर बसलेल्या अवस्थेतील गौरी सजवली जातात. कोकणातील अनेक गावातील घरामध्ये लाकडाच्या पूर्णाकृती गौरी असतात. दरवर्षी या गौरींना नव्या वस्त्रालंकारानी सजवले जातात. अनेक घरामध्ये गौरीचे वर्षानुवर्षाचे ख-या सोन्याचे दागिने ही असतात. कोकणात आज गौरीसाठी गोड नैवेद्य केला जातो, तर उद्या कोकणात सर्वत्र तिखट सण अर्थात गौरीला तिखट नैवेद्य दाखवला जातो. आज गौराईचे आगमन आणि उद्या रात्रभर गौराईचा जागर केला जात असतो.**

### वेगवेगळ्या प्रथा, परंपरा

**माहेवाशीण म्हणून पूजन केली जाणाऱ्या गौरी काही ठिकाणी गणपतीची आई म्हणून येते, ती आपल्या बाळाचे कौतुक पाहण्यासाठी तर कधी ही जगन्माता ज्येष्ठा- कनिष्ठा अशा बहिणीच्या रूपातही येते. कोकणस्थ व कऱ्हाडी ब्राह्मणांकडे खड्यांच्या गौरीची प्रतिष्ठापना केली जाते. देशस्थांच्या घरी उभ्या गौरी असतात. विदर्भात गौरींना महालक्ष्मी म्हटले जाते. यासाठी पितळ, प्लॅस्टर ऑफ पॅरिस किंवा चांदीचे मुखवटे तयार केले जातात.**

### खास गौरीची गाणी

**जिल्ह्यात विशेषत ग्रामीण भागात अत्यंत पारंपरिक पद्धतीने गौराईच आगमन होत असतं. गौरीच्या मुखवट्यासोबत पाणवठ्यावरच्या खड्यांच्या गौरी घरी आणल्या जातात. या गौरी घरी आणत असताना खास गौरीची गाणी म्हटली जातात. गौरीचा मुखवटा धरुन तो पाणवठ्यावरुन घरापर्यंत सुहासीनी घेवून येतात. घराच्या उंबऱ्यावर आलेल्या गौरीचं धुमधडाक्यात स्वागत होतं, आणि गौरी आगमनानं गणपती बाप्पाच्या सणात आणखी भर पडते.**

### गौरीचे स्वागत कसे करावे?

**गौराई आली सोन्याच्या पावलांनी, माणिक मोत्याचा पावलांनी असे म्हणत गौरी माहेरवाशीण म्हणून येते. त्या दिवशी दारात रांगोळी काढून, लक्ष्मीची पावले काढून, ताट आणि चमचा वाजवत गौरीचे मुखवटे घरात आणले जातात. त्यांना छान दागिने, फुलांचे हार, नव्या साड्या नेसून गौरीला सजवले जाते. तिला गोडाधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, पंचपक्वान्न असा बेत केला जातो.**

लाडक्या बाप्पांचे मंगळवारी सर्वत्र जल्लोषात स्वागत झाले. गणरायाच्या आगमनानंतर सर्वत्र गौरींच्या आगमनाची चाहूल लागली होती. धुळे जिल्ह्यासह संपूर्ण खान्देशात हा उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जात असल्याचे पाहायला मिळते. स्वागत करण्यासाठी घरोघरी लगबग सुरू होती. यासाठी महिला गेल्या काही दिवसांपासू विविध कामात मग्न होत्या. घरातील कुटुंबातील सर्व लहान थोर या उत्सवात सहभागी होतात. महिला अगदी नटून सजून गौरींचे स्वागत करत असतात. तीन दिवस या उत्सवामुळे घरात मोठ्या आनंदाचे वातावरण असल्याचे महिला सांगतात.

# गणेशोत्सव शांत, उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करा

## पालकमंत्री दादाजी भुसे यांचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्यातील मोठा उत्सव आहे. आगामी काळातील येणारे सर्व सण, उत्सव तोलामोलात जल्लोषात अन् गुण्यागोविंदाने साजरे करा. यंदाचा सार्वजनिक गणेशोत्सव शांततेत, आनंदात आणि सुरक्षितरित्या साजरा करावा, असे आवाहन नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे. काल गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देताना मंत्री भुसे बोलत होते. पर्यावरणपूरक, शिस्तीत व उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनाची पूर्ण तयारी झाली असून जनतेने यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही मंत्री भुसे यांनी केले आहे.

ना.भुसे पुढे म्हणाले की, शाडू मातीची मूर्ती तसेच ऑरगॅनिक वस्तूंच्या माध्यमातून देखावे तयार करून सामाजिक संदेश मंडळांनी द्यावेत, डीजेऐवजी पारंपारिक वाद्यांचा वापर करणे, पर्यावरणपूरक अथवा समाज उपयोगी उपक्रम राबविणे, गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये कायद्याचे पालन करून महिला, तरुणींना सहभागी होता येईल, असे सुरक्षित वातावरण निर्माण ठेवून आपल्या संस्कृतीचा आदर घालून द्यावा, असे आवाहन देखील भुसे यांनी केले आहे.

गणेश मंडळांनी समाजपयोगी चांगले काम करावे, मंडळासमोर गैरप्रकार टाळून मनोरंजनातून सामाजिक प्रबोधनपर उपक्रम राबविवावे, तसेच सोशल मीडियाच्या माध्यमांवर पोलिस प्रशासनाचे लक्ष असून आक्षेपार्ह पोस्ट टाळावी, गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद सण साजरा करताना सर्व समाज घटकांनी सौहार्दपणे सहभागी होऊन शांतता व उत्साहाच्या वातावरणात सण साजरा करावा. तसेच सामाजिक, विधायक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. यंदा डॉल्बी, डीजेला बंदी असून मंडळांनी पारंपरिक वाद्य, वेशभूषेसह मिरवणूक काढावी तसेच समाजात बंधूभाव वाढविण्यासाठी गणेश मंडळांनी विशेष उपक्रम राबवावेत, असे आवाहन भुसे यांनी केले.

### वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ जि.प.शाळा नवापाडा येथे पुस्तके भेट

**शिरपूर ।** स्वर्गीय हिलाल माळी यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त जि.प. शाळा नवापाडा मुखेड ता. शिरपूर येथे शनिवार ९ सप्टेंबर २०२३ रोजी शाळेच्या ग्रंथालयासाठी, विद्यार्थ्यांसाठी पुस्तके भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लावणे आणि त्यांना विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून देणे हा ग्रंथदान मोहिमेचा उद्देश होता. नाशिक येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य डॉ. मनोहर महाजन व दिनेश माळी यांनी ८ हजार ५०० रुपये किमतीची एकूण १३२ पुस्तके शाळेला भेट केली. कार्यक्रमाला शाळेचे कर्मचारी, विद्यार्थी, पालक व स्थानिक मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक भूपेंद्र राजपूत आणि उपशिक्षक श्री नारायण तायडे यांनी माळी कुटुंबीयांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक वाढीसाठी ही पुस्तके खूप उपयुक्त ठरतील असे सांगितले. तसेच दिवंगत हिलाल माळी यांना श्रद्धांजली वाहिली. डॉ. मनोहर महाजन म्हणाले की, या उदात्त उपक्रमाचा भाग झाल्याचा मला आनंद होत आहे.

# आ.पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कापडणे काँग्रेसतर्फे अल्पोपहार वाटप




### धनुर येथे निंबध स्पर्धा संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे तालुक्यातील धनुर लोणकुटे येथे आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन विविध विषयांवर जनजागृतीपर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे कापडणे येथील काँग्रेस कार्यकर्त्यांनी वृध्दाश्रामात अल्पोपहार आणि फळवाटप केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने दि.१८ सप्टेंबर रोजी धनुर गावात विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आणि नगाव येथील नवजीवन विद्या विकास मंडळाच्या वृध्दाश्रम व मुकबधिर विद्यालयात कार्यक्रम कार्यक्रम घेण्यात आला. कापडणे सेवा सोसायटीचे चेअरमन राजा पाटील आणि ग्रामपंचायत सदस्य हरिष पाटील यांच्यावतीने नवजीवन मंडळाच्या वृध्दाश्रमातील वृध्दांना फळाचे तसेच अल्पोपहाराचे वाटप करुन वाढदिवस साजरा केला. त्याचप्रमाणे धनुर लोणकुटे येथे लोकनियुक्त सरपंच चेतन शिंदे यांनी विद्यार्थ्यांकरीता निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत एकूण ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.यशस्वी स्पर्धकांना रोख रक्कमेचे बक्षिसही देण्यात आले. फळवाटप कार्यक्रमाला कापडणे सेवा सोसायटी चेअरमन राजा पाटील, तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष हरिष पाटील, माजी पं.स.सदस्य नवल पाटील, हिंमत पाटील, रविंद्र पाटील, शरद पाटील, दादाभाऊ पाटील, भटू पाटील, मनोज पाटील,प्रमोद पाटील, भैय्या बोरसे, पिंटू पाटील, भाऊसाहेब पाटील, भैय्या पाटील, जीवन पवार, मनु चव्हाण, विजय बोरसे आदी उपस्थित होते. धनुर निंबध स्पर्धेचे उद्घाटन कार्यक्रमाला सरपंच चेतन शिंदे,उपसरपंच रविंद्र चौधरी, धुडकू पाटील, शरद शिंदे, हंसराज गुजर, अविनाश शिंदे, भटू पाटील, रविंद्र भिल, विजय चौधरी मनोहर खैरनार, ग्रामसेवक शरद ठाकरे,राजेंद्र वाघ, रावसाहेब कोळी, विजय शिरसाठ आदी उपस्थित होते.

## आर. सी. पटेल विद्यालयात राष्ट्रभाषा हिंदी दिवस साजरा

**शिरपूर ।** येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात १४ सप्टेंबर राष्ट्रभाषा हिंदी दिवस व शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल यांचा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी.आर.साळुंखे, प्रमुख पाहुणे एन.ई. चौधरी उपस्थित होते. स्वरचित काव्य लेखनात आई, वडील, राष्ट्रभक्ती, शाळा गुरुजी, पर्यावरण इ. अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेत छान कविता लिहिल्या. इ. ५ वी ते इ.७ वी लहान गटात पाटील वेदांत प्रशांत (इ. ६ वी अ) प्रथम, बागुल चैतन्य राजेंद्र (इ.७ वी अ) द्वितीय, शिरसाठ वैभव संदीप (७ वी ब) तृतीय, थोरात ज्ञानरत्न ज्ञानेश्वर (७ वी ब) उत्तेजनार्थ, (इ. ८ वी ते इ १० वी) मोठ्या गटातून बारी वेदांत राजेंद्र (इ. ८ वी अ) प्रथम, बोरसे दीपक लक्ष्मण (इ ८ वी ई) द्वितीय, चव्हाण धीरज रावसाहेब (इ. ९ वी अ) तृतीय, कोळी यश दिलीप (इ. ८ वी क) उत्तेजनार्थ हे यशस्वी झाले.

# कुसूंबा येथे महाकालेश्वर व पंचमुखी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे तालक्यातील कुसूंबा येथे महाकालेश्वर लिंग स्थापना व पंचमुखी हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा नुकताच पार पडला. श्री श्री १००८ खंडेश्वरी योगी रविंद्रनाथजी गुरू खेतानाथ आईपंथ व शंकर महाराज मठ अंतापूर यांच्या आर्शिवादाने हा सोहळा पार पडला. दि.१२ सप्टेंबर रोजी विधीवत मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांनी मूर्तीचे दर्शन घेवून अभिषेक केला. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात महाप्रसाद म्हणून भंडारा आयोजित करण्यात आला होता.



याप्रसंगी रक्तदान व मोफत दंत चिकित्सा तसेच मोफत रोगनिदान शिबीर घेण्यात आले. शिबीरात कुसूंबा येथील व परिसरातील भाविकांनी आपली आरोग्य तपासणी करुन घेतली.यावेळी ओम भैरवनाथ ट्रस्ट सुक्राम कोकणी बाबा मठ कुसूंबाचे अध्यक्ष विलास शिंदे, बंटी बैरागी, नरेंद्र जिरे, हेमंत अग्रवाल,भरत अग्रवाल, एकनाथ जिरे,राकेश जाधव, संजू भावसार,तेजस शिंदे, किरण सोनवणे,किरण साळवे,चंद्रशेखर जिरे,बबलू चौधरी, जिभाऊ रायते, आबा मिस्तरी, बापू मिस्तरी,सोनू मिस्तरी, डॉ.वसीम मेनन, डॉ.महेंद्र जैन,डॉ.दिपक सोनार यांच्यासह ओम साई राम मित्र मंडळ कुसूंबा आदी उपस्थित होते.प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे आयोजन ओम भैरवनाथ ट्रस्ट कुसूंबा व कुसूंबा ग्रामस्थांनी केले होते.

# धुळे मनपा हद्दवाढ भागासाठी २५ कोटींचा निधी मंजूर!

### खा.डॉ. सुभाष भामरे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**धुळे । प्रतिनिधी**

महापालिका हद्दवाढ क्षेत्रातील पायाभूत विकासासाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटींचा निधी मंजूर करून आणण्यात खा.डॉ. सुभाष भामरे यांना यश आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने खा.डॉ. सुभाष भामरे हे पाठपुरावा करीत होते. त्या पाठपुराव्यास यश येवून पहिल्या टप्प्यात २५ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. त्यातून वलवाडी भागातील विकासकामे करण्यात येणार असल्याची माहिती खा.डॉ. सुभाष भामरे यांनी दिली आहे.

धुळे महापालिका क्षेत्रात हद्दवाढ करीत ११ गावे जोडण्यात आली. या गावातील पायाभूत सुविधा विकासासाठी धुळे महापालिकेच्या माध्यमातून १२१ कोटींचा निधी देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे देण्यात आला होता. धुळे महापालिकेचे विद्यमान महापौर प्रतिभा चौधरी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदिप कर्पे, माजी महानगर जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल, विद्यमान जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी हद्दवाढ भागातील विकास कामांसाठी दिलेला १२१ कोटींचा प्रस्ताव राज्य सरकारने मंजूर करावा, अशी आग्रही मागणी खा.डॉ. सुभाष भामरे यांच्याकडे करीत हा निधी मिळवून देण्यासाठी विनंती केली होती. हद्दवाढ भागातील विकास कामांच्या १२१ कोटी रूपयांच्या प्रस्तावापैकी पहिल्या टप्प्यात २५ कोटी रूपये निधी मंजूर झाल्याचे खा.डॉ. सुभाष भामरे यांनी पत्रकात म्हटले आहे. राज्य सरकारकडून प्राप्त झालेल्या पहिल्या टप्प्यातील २५ कोटींचा निधी हा हद्दवाढ गावांमधील वलवाडी परिसराच्या विकासासाठी मंजूर करण्यात आला असल्याचेही खा.डॉ. सुभाष भामरे यांनी स्पष्ट केले आहे. लवकरच उर्वरीत निधी देखील मंजूर केला जाईल, असा विश्वास खा.डॉ.भामरे यांनी व्यक्त केला आहे.

# माजी सभापती शिवाजी चुंबळेंचे मनपाआयुक्तांना विविध समस्यांचे निवेदन

**सिडको । प्रतिनिधी**

महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग क्रमांक २४ मध्ये गोविंदनगर परिसर, सदाशिवनगर, खांडे मळा, कर्मयोगी नगर, बडदेनगर, मंगलमुर्ती नगर, तिडके नगर, पांगरे मळा, सावरकर चौक, तुळजाभवानी चौक, या सर्व परिसरातील कॉलनी रस्त्यांची खूप दुरावस्था झालेली आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी देखील मोठया प्रमाणात साचत आहे. सदर रस्ता वरदळीचा रस्ता असल्याने नागरिकांना ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे. रस्त्यांचे डांबरीकरण किंवा कॉक्रिटीकरण करावे. अशी मागणी यावेळी केली.

दिलेला निवेदनात म्हटले आहे



की, गोविंदनगर जॉगिंग ट्रॅकबद्दल एवढी उदासीनता आहे. गोविंदनगर जॉगिंग ट्रॅक अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. नागरिकांना आरोग्यदायी वातावरणात फिरता यावे यासाठी जॉगर्स ट्रॅक अतिशय नियोजनबद्ध व शास्त्रीय पद्धतीने निर्माण केले. परंतु सदर ट्रॅक देखभाली अभावी बकाल व दुर्लक्षित झालेला आहे. दुरुस्तीच्या नावाने नाममात्र जाडा भरडा मुरूम टाकून ठिकठिकाणी तुकड्यामध्ये विभागून जेष्ठ नागरिकांची सोय होण्याऐवजी गैरसोय केली आहे. जॉगिंग ट्रॅकवर विटांचे तुकडे वर आलेले आहेत. जेष्ठ नागरिक पाय घसरून पडल्याची खूप उदाहरणे आहे. गोविंदनगर जॉगिंग ट्रॅकच्या परिसरात मोठं मोठे मटेरियल व मातीचे ढिगारे आहे. नागरिकांसाठी अखंड असा जॉगिंग ट्रॅक कसा करता येईल हे आजच्या स्थितीला बघता आरोग्याच्या दृष्टीने नागरिकांसाठी फायद्याचे आहे. मुरूम व पाणी टाकून योग्य त्या शास्त्रीय पद्धतीने दुरुस्त होणे गरजेचे आहे. रोलरने दाबावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नाशिक शहरातील मध्यवस्तीत हा भाग असून सर्वसामान्य रहिवासांचा परिसर असून या परिसरात चार ते पाच जॉगिंग, उद्याने, स्कुल, व्यावसायिक शॉप, नामांकित हॉस्पिटल आहेत. परिसराच्या चारही बाजूने रस्ते, रिंगरोड व हायवे असल्याकारणाने वर्दळीचे ठिकाण झालेले आहे. सिटी सेंटर मॉलपासून ते गोविंदनगर हायवे बोगद्यापर्यंत हा १०० फुटी रोड असल्याने अतिशय वेगाने वाहने जातात. गोविंदनगर जॉगिंग ट्रॅकच्या परिसरात मोठं मोठे मटेरियल व मातीचे ढिगारे आहे.

मुंबई हायवेकडून येणारे वाहने शहरात न जाता सातपूर, गंगापूर महात्मानगर या परिसरात जाण्यासाठी या रोडचा वापर करतात. जॉगिंग ट्रॅकमुळे असंख्य वृद्ध महिला व पुरुष सकाळ- संध्याकाळी फेरफटका मारतात. गोविंदनगर सागर स्वीट जवळ सिग्नल अथवा स्पीड ब्रेकर करण्यात यावा अशी अनेक वर्षांपासून तेथील नागरिकांची मागणी केली आहे.

# होळनांथे येथे श्री गणेशाचे जल्लोषात आगमन



**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळनांथे येथे आर.सी.पटेल सीबीएसई स्कूल मध्ये १९ सप्टेंबर रोजी श्री गणेशाचे जल्लोषात आगमन झाले.

मुख्याध्यापिका सौ. भूमिका गर्ग यांच्या हस्ते श्री गणेश पूजन करण्यात आले. शाळेत गणेशोत्सव निमित्त अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. इ. ५ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी शाळू माती पासून गणपती बनवले, रंगभरण स्पर्धा, गणपतीरायाचे डेकोरेशन करून जल्लोषात गणपती बाप्पाचे आगमन मोठ्या थाटामाटामध्ये करण्यात आले. कार्यक्रमाला कलाशिक्षक चेतन शेवाळे, आनंद जगताप, रितेश मिश्रा, सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.



# सहा हजार घरांमध्ये मातीच्या मूर्तींची स्थापना

## पावसामुळे गणपतीचे आगमन जल्लोषात

















धुळे

। गणपती बाप्पाचे आगमन सगळीकडे जल्लोषात करण्यात आले.  गणेशभक्त घरोघरी ढोलताशा आणि गुलालाची उधळण करत गणपती बाप्पा मोरया मोरयाच्या गजरात जल्लोषात स्वागत करत आहेत. त्यामुळे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात देखील गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात आगमन झाले असून सर्वत्र ढोल ताशांचा गजर ऐकायला मिळाला. घरोघरी गणपती बाप्पाच्या आगमनाने उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. शहरातील काही छोट्या-मोठ्या मंडळांनी त्यांच्या भव्य गणेश मूर्तींना सोमवारी ढोल ताशांच्या गजरात मंडपात आणले. यावेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी लेझीमचा नृत्याचा फेर धरत गणरायाचे जोरदार स्वागत केले. तर काही मंडळातील महिला पदाधिकाऱ्यांनी फुगडीसह नृत्याचा आनंद लुटत गणपतीचे बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर आज घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये विधिवत पूजा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. तसेच घरोघरच्या गणपती बाप्पाच्या स्वागताबरोबरच शहरातील ऑफिसेस, दुकाने यासह आदी ठिकाणी देखील गणपतीची स्थापना करुन प्रत्येकाने आपापल्या परीने बाप्पाचे जोरदार स्वागत केले. तर काही ठिकाणी ढोलताशे, बँडपथक, ध्वजपथक, सनई-चौघड्याच्या सुरात रथामध्ये किंवा पालखीमध्ये बसवून गणरायाची मूर्ती प्रतिष्ठापनेसाठी आणण्यात आली.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र









# जिल्ह्यात २१ गावांत 'एक गाव एक गणपती'


















धुळे । गायब झालेला पाऊस गणेशोत्सवापूर्वी आल्याने दुष्काळाच्या संकटाचे मळभ दूर सारत विघ्नहर्त्या गणरायाचे मंगळवारी जल्लोषात आगमन झाले. जल्लोषात गणरायांच्या स्वागतासाठी बाजारपेठेचा उत्साह द्विगुणित झाला. गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळपासूनच घरगुती गणेशांच्या स्थापनेसाठी गणेशमूर्तीसह पूजा साहित्याच्या खरेदीसाठी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गर्दी झाली. यावर्षी नागरिकांचा कल पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्थापन करण्याकडे अधिक राहिला. साधारण सहा हजार घरांमध्ये मातीच्या गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली. दुपारनंतर शहरातील मोठ्या गणपतींच्या मिरवणुकांनी लक्ष वेधले. १२८ वर्षांनंतरही आपले वेगळेपण जपणाऱ्या तथा मानाच्या 'खुनी गणपती'चे टाळ-मृदंगाच्या गजरात पालखीतून आगमन झाले. जुलै,ऑगस्ट महिन्यात पावसाच्या खंडामुळे दुष्काळाचे संकट निर्माण झाले होते. मात्र गणरायाच्या आगमनापूर्वीच पाऊस झाल्याने सध्या दिलासा मिळाला आहे. पाऊस चांगला झाल्याने गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात साजरा होत आहे.

संकलन : दिपक वाघ